ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.077
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
Oct-Nov -Dec 2022
Vol. 11 No. 4

# आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताची भूमिका एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. अशोक कोरडे[1], विवेक तात्यासाहेब जेवे[2]**

[1]*मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस. के. गांधी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड*

[2]*संशोधक विद्यार्थी, स. प. महाविद्यालय पुणे, ४११०३०*

***Corresponding Author:* विवेक तात्यासाहेब जेवे**

**DOI - 10.5281/zenodo.14545633**

**प्रस्तावना:**

भारत एक औद्योगिक सामाजिक आर्थिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये अग्रगण्य असे राष्ट्र आहे त्यामुळे या सर्व क्षेत्रांमध्ये होणाऱ्या विकासामुळे भारताला प्रगतशील अष्ट म्हणून पाहिले जाते भारत देशाचे आंतरराष्ट्रीय व्यापाराची भूमिका महत्त्वाची आहे कारण भारत देश हा जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आंतरराष्ट्रीय व्यापार हा कोणत्याही देशाचा आर्थिक विकासाचा आधारस्तंभ मानला जातो भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार इतिहास प्राचीन काळापासून चालत आलेला असून मसाले कापड आणि मौल्यवाद धातूंच्या व्यापाराने भारत जगभर प्रसिद्ध होता आधुनिक काळातही भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापारात सक्रिय भूमिका राहिली आहे आंतरराष्ट्रीय व्यापार हा कोणत्याही देशाचा आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा असतो भारताचे स्थान जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये जगातील पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था असल्याने जागतिक व्यापारात महत्त्वाचे आहे भारताने स्वीकारलेले विविध धोरणे ज्यामध्ये मुक्त व्यापार करार जागतिकीकरण अशा भारताच्या इतर सर्वच आर्थिक धोरणामुळे भारताने जागतिक व्यापारात आपली भूमिका अधिक मजबूत केली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार हा जागतिक अर्थव्यवस्थेतील मुक्तता भाग आहे देशा देशांमध्ये चालणारा व्यापार सेवा, विविध उत्पादनांची आणि भांडवलाच्या देवाण-घेवामुळे सुलभ हा आंतरराष्ट्रीय व्यापार करत असतो.

भारत हा जागतिक व्यापारातील आपली भूमिका सुदृढ करण्यासाठी नेहमी प्रदेश प्रयत्नशील असतो. भारतात औद्योगीकरणामुळे आणि जागतिकीकरणामुळे भारताने अनेक बाजारपेठेमध्ये आपले स्थान हे बळकट केले आहे. आज आपण पाहिले तर औद्योगिक उत्पादने औषध निर्मिती माहिती तंत्रज्ञान सेवा कृषी उत्पादने त्याचबरोबर ऊर्जा हे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे खऱ्या अर्थाने मुख्य आधारस्तंभ आहेत मुख्य मुक्त व्यापार करार डिझेल क्रांती आणि उत्पादन क्षेत्रातील सुधारणा यांच्या माध्यमातून भारताने जागतिक व्यापारात महत्त्वपूर्ण योगदान देण्याची सुरुवात केली आहे त्याचबरोबर व्यापार तूट जागतिक मंदी आणि

जागतिक स्तरावर वाढती स्पर्धा ही काही प्रमुख आव्हाने भारताच्या व्यापार धोरणासमोर आहेत या अभ्यासातून भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारताचे भूमिका त्याचबरोबर सध्याची स्थिती आणि भविष्य याबद्दल आपण अभ्यास करणार आहोत.

**भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप:**

**मुख्य निर्यातीचे उत्पादने:**

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे भरपूर क्षेत्रांमध्ये उत्पादन आपल्या देशामध्ये तयार करून ते निर्यातीसाठी बाहेर पाठवले जाते त्याचबरोबर ज्या गरजेच्या बाबी आहेत त्याची आयात केली जाते ती खालील प्रमाणे

- **औद्योगिक उपकरणे:** औद्योगिक उपकरणांमध्ये अभियांत्रिकी साहित्य ऑटोमोबाईल आणि मशनरी चा समावेश होतो.
- **औषध निर्मिती:** भारताला जगाचे औषध जर असे समजले जाते त्यामुळे भारत हा जगातील मोठ्या प्रमाणावर औषधे निर्यात करणारा देश आहे.
- **कृषी उत्पादने:** तांदूळ मसाले चहा साखर आणि कापूस ही प्रमुख उत्पादने भारत निर्यात करतो.
- **पेट्रोलियम उत्पादने:** भारतातील शुद्धीकरण क्षेत्राच्या प्रगतीमुळे निर्यातीचा एक मोठा भाग पेट्रोलियम उत्पादने आहे.
- **कपडे आणि हात माग:** पारंपारिक भारतीय कापडाची संपूर्ण जगामध्ये मोठ्या प्रमाणात मागणी आहे त्यामुळे कपडे आणि हातमागची निर्यात मोठ्या प्रमाणात होताना दिसते.

**मुख्य आयातीचे उत्पादने**:

- **खनिज तेल आणि इंधन:** भारताला लागणाऱ्या मोठ्या प्रमाणावर ऊर्जा ची गरज भागवण्यासाठी भारत तेल आयात करत.
- **सोन आणि चांदी:** दागिन्यासाठी भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर सोनानी चांदी आयात करावी लागते
- **इलेक्ट्रॉनिक उपकरणे:** मोबाईल संगणक त्याचबरोबर नवनवीन उपकरणांची मागणी वाढत असल्याने त्याच्या आयातीमध्ये वाढ होत आहे.
- **औद्योगिक कच्चामाल:** रासायनिक उत्पादने लोह आणि पोलाद यांसारख्या कच्च्या मालाची आयात भारत करतो.

**आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारताची ताकद**:

भारताचे भौगोलिक स्थिती ही भारताच्या व्यापारासाठी अतिशय फायदेशीर आहे कारण भारत हा देश अशा युरोप आणि आफ्रिकेच्या मधोमध आहे त्यामुळे भारताचे ताकद वाढवण्यासाठी भारताचे भौगोलिक स्थान हे खूप महत्त्वाचे आहे.

- **सांस्कृतिक विविधता आणि कौशल्य:** भारताला प्रचंड मोठी सांस्कृतिक असा इतिहास लाभलेला आहे त्यामुळे विविध उत्पादने आणि विविध सेवा यांची कुशलता भारतीयांमध्ये मोठ्या प्रमाणात आहे त्याचबरोबर सॉफ्टवेअर व सेवा क्षेत्रात भारताची वाढती प्रगती हे देखील भारताची आंतरराष्ट्रीय व्यापारात एक महत्त्वाची ताकद आहे.
- **स्वस्त कामगार शक्ती:** भारतामध्ये उत्पादन खर्च कमी असल्यामुळे भारतात उत्पादित वस्तूची जागतिक बाजारात मागणी जास्त आहे कमी उत्पादक खर्च आणि स्वस्त कामगार यामुळे त्यामधील नफा हा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे ही एक महत्त्वाची आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारताची ताकद म्हणता येईल.
- **मुक्त व्यापार धोरणे:** भारताने मुक्त व्यापार धोरण स्वीकारली असल्यामुळे भारताने अनेक देशासोबत मुक्त व्यापार करार केले आहेत त्याच्यामुळेच भारताच्या व्यापारात प्रचंड वाढ झालेली आहे.

**भारताची आर्थिक प्रगती आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्थान:**

- **आर्थिक सुधारणा (1991 नंतर):** उदारीकरण, खाजगीकरण, आणि जागतिकीकरणामुळे भारत आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्त्वाची भूमिका बजावतो आहे.
- **GDP आणि व्यापाराचे प्रमाण:** जागतिक GDP मध्ये भारताचा वाटा वाढत आहे. भारताचे आयात-निर्यात धोरण या संदर्भात महत्त्वाचे आहे.

**आंतरराष्ट्रीय संस्थांमधील सहभाग:**

- **WTO (World Trade Organization):** भारत व्यापार वादांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो.
- **BRICS आणि G20:** भारत जागतिक व्यापार धोरणांमध्ये आपला प्रभाव टाकतो

**आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारताच्या समस्या आणि आव्हाने:**

- भारतामध्ये तयार होत असलेले उत्पादन याची किंमत किंवा मूल्य हे दुसऱ्या देशांमध्ये असणाऱ्या तयार होणाऱ्या उत्पादनाच्या किमतीपेक्षा जास्त असल्या दिसून येत आहे त्यामध्ये महत्त्वाचे उदाहरण म्हणजे चीन व्हिएतनाम बांगलादेश यांसारखे देशात कमी दर आणि उच्च दर्जाच्या उत्पादनामुळे एक मोठ्या प्रमाणात स्पर्धा आंतरराष्ट्रीय स्पर्धा त्या ठिकाणी भारताच्या व्यापारातील एक समस्या आहे

- **आधुनिकीकरणाचा अभाव:** भारतामध्ये आधुनिकीकरणाचा अभाव हा प्रचंड प्रमाणात जाणवताना दिसतो पारंपारिक उत्पादन पद्धती भारतामध्ये अवलंबली जाते त्यामुळे जागतिक मागणीसाठी दर्जेदार उत्पादनामध्ये अडचणी या पारंपारिक उत्पादन पद्धतीमुळे येत असल्याचा दिसून येत आहे
- **आयात निर्यात असमतोल:** कच्च्या तेलावर अवलंबून राहिल्यामुळे व्यापार तूट वाढत आहे भारत हा कच्चे तेल बाहेरील देशाकडून आयात करत असल्यामुळे व त्या तुलनेने भारताची निर्यात ही कमी होत असल्याने आयात निर्यात यामध्ये असमतोल दिसून येत आहे
- **प्राथमिक सुविधांची कमतरता:** भारतामध्ये आयात आणि निर्यात ज्या ठिकाणी होते त्या बंदराचे आधुनिकीकरण हे महत्त्वाचे आहे तेथे प्राथमिक सुविधा या कमी प्रमाणात भेटत असल्यामुळे ही एक महत्त्वाची समस्या मानली जात आहे त्याचबरोबर वेगवान वाहतूक प्रणाली आणि लॉजिस्टिक मध्ये ही अडथळा भारतात येत आहे

**आंतरराष्ट्रीय व्यापार सुधारण्यासाठी भारताचे धोरणे:**

- **उत्पादन क्षेत्राचा विकास:** भारतामध्ये सेवा क्षेत्र आणि उद्योग क्षेत्र यांचा विकास हा महत्त्वाचा मानला जात आहे त्यामुळे मेक इन इंडिया आणि पी एल आय योजना यांसारख्या उपक्रमा अंतर्गत उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत व कशा प्रकारे मोठ्या प्रमाणात औद्योगीकरणाच्या माध्यमातून उत्पादन क्षेत्राचा विकास करण्यासाठी स मदत होईल याबद्दल चे धोरणे भारत सरकार राबवत असल्याचे दिसून येते
- **तंत्रज्ञानाचा उपयोग:** भारतामध्ये सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग हा मोठ्या प्रमाणावर होत असल्याचा दिसून येतो त्याचा सर्वात मोठे उदाहरण म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच AI या मदतीने विविध कामे हे आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या माध्यमातून करून कामाचा व्याप कमी करता येऊ लागलेला आहे त्यामध्ये यायच्या मदतीने आपण विविध कामे हे एका क्लिक वरती करू शकतो त्याचबरोबर स्वयंचलित उत्पादन पद्धतीचा उपयोग करून जागतिक दर्जाचे उत्पादन तयार करणे यांसारखे तंत्रज्ञान याचा उपयोग भारतामध्ये केला जात आहे

- **मुक्त व्यापार कराराचे पुनरावलोकन:** भारतामध्ये ज्या प्रमाणात निर्यात होते त्याच प्रमाणात आयात झाली पाहिजे हे धोरण भारत सरकारचे असते वही न झाल्यास व्यापार तूट त्या ठिकाणी होत असते ही व्यापार तूट कमी करण्यासाठी नवीन मुक्त व्यापार कराराची आखणी व सुधारणा या भारताच्या धोरणांमध्ये केल्याचे दिसून येते
- **इन्फ्रास्ट्रक्चर विकास:** भारतामध्ये सर्वच क्षेत्रांमध्ये विकास होताना आपल्याला दिसत आहे त्यापैकीच भारतात असणारे बंदरे रस्ते रेल्वे आणि हवाई मार्गाचे आधुनिकीकरण या सर्वांचा विकास होताना आपल्याला दिसत आहे हे सर्व गोष्टी हे आंतरराष्ट्रीय व्यापारात कुठेतरी प्रभाव पाडत असतात
- **कौशल्य विकास कार्यक्रम:** जागतिक स्तरावरील मागणी लक्षात घेऊन भारतामध्ये असणाऱ्या कामगारांना योग्य ते प्रशिक्षण देऊन कुशल कामगार तयार करण्यासाठी भारतामध्ये कौशल्य विकास कार्यक्रमा सारखे उपक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणात करणे हे देखील भारताचे धोरण आहे
- **कृषी निर्यातीसाठी प्रोत्साहन:** भारतामध्ये तयार होणारा फळे भाजीपाल्या आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांच्या निर्यातीला चालना देणे हे देखील भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील एक महत्त्वाचे धोरण आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारताच्या भविष्यातील संधी:**

- **डिजिटल व्यापार:** भारतामध्ये आता मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण होताना दिसत आहे त्यामध्ये महत्त्वाचे गोष्ट म्हणजे डिजिटल व्यापार ही नवीन आलेली संकल्पना आहे भारताचे आयटी सेवा क्षेत्रातील ताकद वाढून सायबर स्पेस मधील व्यापार वाढवणे हे डिजिटल व्यापारचे उद्दिष्ट आहे याच्या माध्यमातून भारत हा भविष्यामध्ये जागतिक पातळीवर व्यापार करू शकतो
- **आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करणे:** भारतातील तरुणांना योग्य तो रोजगार मिळवण्यासाठी आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करणे हे महत्त्वाचे आहे त्यासाठी एवढ्या वाढवून मोठ्या प्रमाणावर उत्पादने तयार करणे आणि निर्यात वाढवणे हे महत्त्वाचे आहे

**निष्कर्ष:**

भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार हा देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा कणा आहे, ज्यामुळे भारताला जागतिक पातळीवर एक अग्रगण्य स्थान

मिळाले आहे. प्राचीन काळापासून मसाले, कापड, आणि मौल्यवान धातूंच्या व्यापारामुळे भारत एक समृद्ध व्यापार केंद्र म्हणून ओळखला जात होता. मध्ययुगात रेशीम मार्ग आणि समुद्री व्यापार मार्गांद्वारे भारताचा व्यापार वाढत गेला, तर आधुनिक काळात औद्योगिकीकरण, जागतिकीकरण, आणि आर्थिक सुधारणा यामुळे भारताने जागतिक व्यापारात आपली भूमिका अधिक सशक्त केली. आज भारत औद्योगिक उपकरणे, औषधनिर्मिती, कृषी उत्पादन, पारंपरिक हस्तकला, आणि माहिती-तंत्रज्ञान सेवा या क्षेत्रांमध्ये जागतिक बाजारपेठेत आपले स्थान मजबूत करत आहे.

भारताची निर्यात मुख्यतः औद्योगिक उपकरणे, ऑटोमोबाईल, औषधे, तांदूळ, मसाले, चहा, आणि पेट्रोलियम उत्पादने यावर आधारित आहे. याशिवाय, भारतीय कापड आणि पारंपरिक हस्तकला यांना जागतिक स्तरावर मोठी मागणी आहे, जी भारताच्या सांस्कृतिक वारशाची ओळख पटवते. मात्र, देशाला मोठ्या प्रमाणावर खनिज तेल, सोनं-चांदी, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, आणि औद्योगिक कच्च्यामालाची आयात करावी लागते, ज्यामुळे व्यापार तुटीचा मोठा प्रश्न उभा राहतो. भारताच्या ऊर्जा गरजा, दागिने निर्मिती, आणि तांत्रिक उत्पादनाच्या मागण्या भागवण्यासाठी या आयाती अनिवार्य ठरतात.

भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील यशाचे मुख्य घटक म्हणजे त्याचे भौगोलिक स्थान, सांस्कृतिक विविधता, स्वस्त कामगारशक्ती, आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कौशल्य. आशिया, युरोप, आणि आफ्रिका या खंडांच्या मध्यभागी असलेल्या भारताच्या स्थानामुळे व्यापारासाठी भौगोलिक दृष्टिकोनातून मोठा लाभ मिळतो. स्वस्त उत्पादन खर्च आणि कुशल कामगारांच्या उपलब्धतेमुळे भारतीय उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे. याशिवाय, भारताने मुक्त व्यापार धोरणे स्वीकारल्याने विविध देशांशी व्यापार संबंध अधिक सशक्त झाले आहेत.

तथापि, भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासमोर अनेक आव्हाने आहेत. जागतिक स्पर्धा, पारंपरिक उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब, आणि पायाभूत सुविधांतील कमतरता ही प्रमुख समस्या आहेत. चीन, व्हिएतनाम, आणि बांगलादेशसारख्या देशांशी उत्पादन खर्च आणि गुणवत्तेत स्पर्धा करताना भारताला अडचणींचा सामना करावा लागतो. याशिवाय, आयात-निर्यात असमतोलामुळे भारताला आर्थिक अस्थिरतेचा धोका निर्माण होतो. देशातील बंदरांचे आधुनिकीकरण, वेगवान वाहतूक प्रणाली, आणि लॉजिस्टिक सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

भारताने या आव्हानांवर मात करण्यासाठी उत्पादन क्षेत्राचा विकास, तंत्रज्ञानाचा उपयोग, आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी धोरणात्मक उपाययोजना केल्या आहेत. "मेक इन इंडिया," "PLI योजना," आणि डिजिटल व्यापार यांसारख्या उपक्रमांद्वारे उत्पादन क्षेत्राला चालना देण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI),

स्वयंचलित उत्पादन प्रणाली, आणि डिजिटल साधनांच्या वापरामुळे जागतिक दर्जाचे उत्पादन शक्य झाले आहे. तसेच, कृषी उत्पादनांची निर्यात वाढवण्यासाठी सरकार विशेष धोरणे आखत आहे.

भविष्यात, हरित तंत्रज्ञान, नवउद्योग (स्टार्टअप्स), आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रांमध्ये भारताला मोठ्या संधी उपलब्ध आहेत. डिजिटल व्यापार क्षेत्रात भारताची प्रगती होत असून, सायबर स्पेस आणि आयटी सेवांमध्ये तो जागतिक नेता बनत आहे. भारताचे लक्ष आता नवकल्पना, तंत्रज्ञान, आणि आर्थिक स्थिरतेवर केंद्रित आहे, ज्यामुळे देश जागतिक पातळीवर व्यापार नेत्याच्या भूमिकेत अधिक दृढ होईल.

या सर्व उपाययोजनांमुळे भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक सशक्त होईल, आणि "विकासशील अर्थव्यवस्था ते जागतिक नेता" हा भारताचा प्रवास प्रेरणादायी ठरेल. आर्थिक धोरणांमधील सातत्यपूर्ण सुधारणा आणि जागतिक परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या क्षमतेमुळे भारत भविष्यातील व्यापाराच्या संधींना अधिक प्रभावीपणे साध्य करेल.

**संदर्भ:**

१. **वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय (Ministry of Commerce and Industry):**
संकेतस्थळ: https://commerce.gov.in

२. **नीती आयोग (NITI Aayog):**
संकेतस्थळ: https://www.niti.gov.in

३. भारतीय निर्यात-आयात बँक

४. इंडियन काउन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्स (ICRIER):

५. **सीएमआयई (CMIE) अहवाल:** (आर्थिक प्रगती, औद्योगिक वाढ, आणि व्यापारातील आकडेवारी)

६. फॉर्ब्स इंडिया आणि इकॉनॉमिक टाइम्स